**Bachelor of Arts (B.A.) Fifth Semester Examination**

**MARATHI**

**Compulsory Paper—1**

**(Other Language)**

वेळ— तीन तास] [एकूण गुण — 80

**सूचना :—** (1) **पाचही** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.

(2) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

1. 'किडलेली माणसं' या कथेच्या आधारे पांढरपेशा मध्यमवर्गाच्या मनोवृत्तीचे दर्शन प्रा. गंगाधर गाडगीळांनी समर्थपणे घडविले आहे'. हे विधान स्पष्ट करा.

**किंवा**

'युगाला आकार देणारे आम्ही काळपुरुष आहेत' असे विनोबा भावे का म्हणतात ? 16

2. 'चाफा' या कवितेचा आशय स्पष्ट करा.

**किंवा**

'कळा ज्या लागल्या जीवा' या कवितेच्या आधारे मानवी जीवनाचे चित्र रेखाटा. 16

3. खालीलपैकी कोणत्याही **एकाच गटातील** प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे **शंभर** शब्दांत लिहा :—

**गट 'अ'**

(क) कृष्णार्जुनाने खांडववनात केलेला प्राणिसंहार आणि तक्षक नागाचे घराणे याबाबत महाभारतात आलेली कथा 'मयसभा' पाठाद्वारे वर्णन करा.

(ख) 'वीव्हावो स्वीकारू' या लीळेतील आशय स्पष्ट करा.

(ग) 'समाधान' कवितेतील नायक कोणत्या बिकट परिस्थितीत असतो ?

(घ) 'आलिया भोगासी असावे सादर' या अभंगाचा भावार्थ उलगडून दाखवा.

**किंवा**

**गट 'ब'**

(च) आगरकरांनी सांगितलेल्या प्रचलित धर्मविषयक स समाजविषयक कल्पना स्पष्ट करा.

(छ) खुटमुटयांच्या चाळीतील मालतीबाईचे स्वभावचित्र रेखाटा.

(ज) 'पंढरीवर्णन' कवितेच्या आधारे विठ्ठल-रुक्मिणी संवाद वर्णन करा.

(झ) 'जन विषयाचे किडे
यांची धांव बाह्याकडे' या ओळीचा अर्थ स्पष्ट करा. 16

4. खालीलपैकी कोणत्याही **एकाच गटातील** प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **शंभर** शब्दांत लिहा :—

**गट 'क'**

(त) स्मरणिका कोणत्या प्रसंगी प्रकाशित केली जाते ? सोदाहरण स्पष्ट करा.

(थ) आशय संपादन म्हणजे काय ?

(द) कार्यालयीन टिप्पणीचे प्रकार किती व कोणते.

(ध) जाहीर निवेदनात कोणत्या तीन गोष्टी महत्त्वाच्या असतात ?

**किंवा**

**गट 'ड'**

(प) कंपनीच्या उत्पादनासंबंधीच्या माहिती पत्रकाचे स्वरूप स्पष्ट करा.

(फ) 'आवाहन' या लेखनप्रकाराचे स्वरूप कसे असते ?

(ब) गौरवग्रंथाचे स्वरूप स्पष्ट करा.

(भ) संपादनाच्या प्रेरणा कोणत्या ? 16

5. **सर्व** प्रश्नांची उत्तरे संक्षिप्त स्वरूपात लिहा :—

(i) प्राचीन काळात लग्नप्रसंगी भोजनामधे असलेल्या पदार्थाची नावे लीळेच्या आधारे लिहा.

(ii) खांडववनात मयाने कुणाचा धावा केला व कशाकरिता ?

(iii) कवी तांबे यांनी आपल्या कवितेमधे जनरीतीचे कोणते वर्णन केले आहे ?

(iv) पत्नीच्या प्रेमळ सहवासामुळे कवीला कोणते समाधान मिळते ?

(v) आवाहन लेखनामागे कोणता उद्देश असतो ?

(vi) माहितीपत्रकाचा कशासाठी उपयोग केला जातो ?

(vii) संहिता वाचनाचे महत्व स्पष्ट करा.

(viii) गौरवग्रंथ केव्हा काढला जातो ? 16